श्रीशिवाजीशिक्षणप्रसारकमंडळ, बार्शीसंचलित

# श्रीशिवाजीमहाविद्यालय,बार्शी

(कलाआणिविज्ञान- कनिष्ठआणिवरिष्ठ)

**पोस्टबॉक्सनंबर ४ मु. पो. बार्शी-४१३४११ जि. सोलापूर (महाराष्ट्र)**

**नॅकमुल्यंनकनग्रेड : "अ"**

**प्र. प्राचार्य प्रा. डॉ. भारती रेवडकर**(एम.ए., एम. फिल., नेट., पीएच. डी)

**☎:कार्यालय** (०२१८४) २२२३८२ ● फॅक्स : (०२१८४) २२२३८२ E-mail :ssmb_barshi@rediffmail.com

*ज्यु.रजि.एच.एस.सी./९७६/१३९७२ (एस.वाय.) दि.७.५.१९७६ *सिनि.ऑफि.पत्र / .जी.इ.एन/ऑफि/२८३२,दि.४.३.१९६४/शिवाजी विद्यापीठ.
*पी.जी.भाषा/बी.जी./बी.यु.टी.आर/आय./३०४७१/दि.२७.५.१९७२. *सोशल सायन्स/पी.डब्ल्यू./बी.यु.टी.आर./३९०६,दि.३०.९.१९७२.

**जा. क्र. श्रीशिमबा/** 1021 **/२०२१-२२** **दिनांक :** 17 / 03 / **२०२२**

**प्रति,**
**मा. संचालक,**
राष्ट्रीय सेवा योजना,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय : जागतिक महिला दिना निमित्त आयोजित कार्यक्रमाचा अहवाल स्विकारणेबाबत.**

महाशय,

उपरोक्त विषयास व संदर्भांस अनुसरुन कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "संरक्षणविषयक जाणीव जागृती" आणि "माझी वसुंधरा उपक्रमातील महिलांचा सहभाग" अशा संकल्पनेवर आधारीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. भारती रेवडकर होत्या. बार्शीतील जेष्ठ शल्य चिकित्सक डॉ. मिनाक्षी पाटील, जेष्ठ विधिज्ञ ॲड. प्रविणा पाटील आणि एम.आय.टी संकुलाचे प्राचार्य रेखा पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. भारती रेवडकर संपादित "स्त्री आणि साहित्य : नोंदणी आणि निरीक्षणे " या आंतरराष्ट्रीय जर्नलच्या महिलांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानावर आधारित आंतरराष्ट्रीय जर्नलच्या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. भारती रेवडकर यांनी महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या संघर्षाच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी जागतिक महिला दिन व्यापक प्रमाणावर साजरा करण्याची आवश्यकता असून धोरणात्मक निर्णय प्रक्रीयेत महिलांना स्थान असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. ॲड. प्रविणा

पाटील यांनी, "संसारिक आणि सामाजिक जीवनात स्त्री ची भूमिका केंद्रस्थानी असल्यामुळे तीने कोणाच्या मेहबानीवर विसंबून न राहता सक्षम होण्याची आवश्यकता प्रतिपादन करुन स्त्रीयांच्या हक्काच्या कायदेशीर तरतुदीबाबत सखोल मार्गदर्शन केले. तर डॉ. मिनाक्षी पाटील यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांच्या निराकरणासाठी शिक्षण व्यवस्थेत लैंगिक शिक्षणाला महत्वाचे स्थान मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य रेखा पाटील यांनीही विद्यार्थीनिंनी 'हम झुकेंगे नहीं' च्या भूमिकेत राहण्याची आवश्यकता असल्याचे सांगीतले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. भारत बिचितकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करुन जागतिक महिला दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. प्रा. दामाजी भिसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर डॉ. सोमनाथ यादव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ. संध्या साळुंखे यांनी आभार मानले. प्रा. विजया जगताप यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. शेवटी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे काही निवडक फोटो सोबत जोडत आहे. सदर अहवालाचा स्विकार व्हावा.

कळावे,

ठिकाण : बार्शी

दिनांक : ०८/०३/२०२२

आपली विश्वासू

( डॉ. भारती रेवडकर )

प्र. प्राचार्य

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी











दैनिक दिव्य मराठी, सोलापूर गुरुवार दि. १७.०३.२०२२

# धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत महिलांना स्थान असणे आवश्यक : प्राचार्य डॉ. भारती रेवडकर

प्रतिनिधी | बार्शी



महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या संघर्षाच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी जागतिक महिला दिन व्यापक प्रमाणावर साजरा करण्याची आवश्यकता आहे. धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत महिलांना स्थान असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. भारती रेवडकर यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

बार्शीतील ज्येष्ठ शल्य चिकित्सक डॉ. मीनाक्षी पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रविणा पाटील आणि एमआयटी संकुलाच्या प्राचार्य रेखा पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. भारती रेवडकर संपादित 'स्त्री आणि साहित्य : नोंदणी आणि निरीक्षणे' या महिलांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानावर आधारित आंतरराष्ट्रीय जर्नलच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शिवाजी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती आणि निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संरक्षणविषयक जाणीव जागृती आणि माझी वसुंधरा उपक्रमातील महिलांचा सहभाग अशा संकल्पनेवर आधारीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ॲड. प्रविणा पाटील यांनी सांसारिक आणि सामाजिक जीवनात स्त्री ची भूमिका केंद्रस्थानी असल्यामुळे तीने कोणाच्या मेहबानीवर विसंबून न राहता सक्षम होण्याची आवश्यकता प्रतिपादन करून स्त्रियांच्या हक्काच्या कायदेशीर तरतुदीबाबत सखोल मार्गदर्शन केले. तर डॉ. मीनाक्षी पाटील यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांच्या निराकरणासाठी शिक्षण व्यवस्थेत लैंगिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य रेखा पाटील यांनीही विद्यार्थिनींनी 'हम झुकेंगे नहीं'च्या भूमिकेत राहण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. भारत बिचितकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून जागतिक महिला दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. प्रा. दामाजी भिसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर डॉ. सोमनाथ यादव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ. संध्या साळुंखे यांनी आभार मानले. प्रा. विजया जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवटी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.